**Publication:** Lokmat
**Date:** 20/10/2015
**Edition:** Mumbai
**Page No:** 3
**Headline:**Podar School wins quiz competition

# प्रश्नमंजूषा स्पर्धेत पोद्दार शाळा विजयी

**मुंबई :** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे घेण्यात आलेल्या 'टीसीएस आयटी विझ २०१५' या आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेत पोद्दार शाळेच्या अभिषेत मुठांगे आणि निखिल कुमार यांनी सुयश संपादन केले आहे.

इंडियन सोसायटीच्या माणिक सभागृहात रविवारी ही प्रश्नमंजूषा स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत शहरातील आणि उपनगरातील विविध शाळांच्या ७०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना आयपॅड एअर देण्यात आला. तर प्राथमिक फेरीत विजयी ठरलेल्या राजहंस विद्यालयाच्या अवी सेठ आणि यश शर्मा यांना आयपॅड मिनी आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.प्राथमिक चाचणीतून अंतिम परीक्षेला पोहोचलेल्या अन्य विजेत्यांना विविध पारितोषिके देण्यात आली. या स्पर्धेत विजयी ठरलेले स्पर्धक राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धेत प्रतिनिधित्व करतील.